RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ४०] सोमवार, मार्च २८, २०२२/चैत्र ७, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च २०२२.

**अधिसूचना**

**अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२२.**

क्रमांक अमपा-२०२० /प्र.क्र. २०५/नवि-२५.— अहमदनगर महानगरपालिकेमध्ये अंमलात असलेले सध्याचे अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ मध्ये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) अंतर्गत, अहमदनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करण्यात येत आहेत :–

**नियम**

१. **संक्षिप्त नाव, प्रांरभ व व्याप्ती :–**

१. या नियमांना "अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२२" असे संबोधण्यात येईल.

२. हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

३. या नियमांन्वये, अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा उल्लेख "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे ) च्या परिशिष्ट (२) मधील तक्त्यातील अ.क्र. ११६ ते अ.क्र. १२३ या अनुक्रमांकासमोरील पदांच्या "नेमणुकीची पद्धत व टक्केवारी" आणि "नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती" यामध्ये खालील तक्त्यातील उक्त क्रमांकासमोरील पदासमोर दर्शविल्यानुसार सुधारणा करण्यात येत आहे.

४. या नियमांस मुख्य नियमांतील अन्य सर्व तरतुदी यथास्थिती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शं. त्र्यं. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

# अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२१

परिशिष्ट (२)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता [पहा (नियम ३)]

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|---|
| | | | १. नामनिर्देशन | |
| | | | २. पदोन्नती | |
| | | | ३. प्रतिनियुक्ती | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ११६ | अग्निशमन सेवा श्रेणी -१ | मुख्य अग्निशमन अधिकारी (Chief Fire Officer) (६व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.१५६००-३९१००+ग्रेड पे ५४००/-) | पदोन्नती १००% | अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | | प्रतिनियुक्ती | पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास, सदर अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, राज्य/केंद्र शासन/निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेतील समकक्ष पद किमान ०३ वर्षांपासून धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ११७ | अग्निशमन सेवा श्रेणी -२ | उप अग्निशमन अधिकारी (Deputy Chief Fire Officer) (६व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.९३००-३४८००+ग्रेड पे ४४००/-) | पदोन्नती १००% | अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थानक अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या व राष्ट्रीय/राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (बी.ई.फायर) किंवा Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) किंवा The Institution of Fire Engineers (U.K./India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I. Fire) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Institution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेल्या अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | | प्रतिनियुक्ती | पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास, सदर अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, राज्य/केंद्र शासन/निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेतील समकक्ष पद किमान ०३ वर्षांपासून धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ११८ | अग्निशमन सेवा श्रेणी -३ | स्थानक अधिकारी (अग्निशमन केंद्र अधिकारी) (Fire Station Officer) (६व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.९३००-३४८००+ग्रेड पे ४२००/-) | पदोन्नती १००% | अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सब ऑफीसर या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|---|
| | | | १. नामनिर्देशन | |
| | | | २. पदोन्नती | |
| | | | ३. प्रतिनियुक्ती | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ११९ | अग्निशमन सेवा<br>श्रेणी -३ | सब ऑफीसर<br>(Fire Fighter Superintendent)<br>(६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.९३००-३४८००+ग्रेड पे ४२००/-) | नामनिर्देशन<br>२५% | 1) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>ब) राष्ट्रीय/राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा, किंवा, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पुर्ण केलेला असावा किंवा The Institution of Fire Engineers (U.K./India) या संस्थेकडून Grade-१ ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>क) ड-वर्ग महानगरपालिका/शासकीय/निमशासकीय सेवेमध्ये फायरमन/चालक यंत्रचालक या पदावर किमान किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पुर्ण केलेला असावा.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान असावे.<br>इ) **शारीरिक पात्रता :-**<br>१) उंची - किमान १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२) छाती - साधारण ८१ सें.मी., फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>३) वजन - किमान ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी - चांगली.<br>फ) **वयोमर्यादा** – उमेदवाराचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |
| | | | पदोन्नती<br>७५% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लिडींग फायरमन या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १२० | अग्निशमन सेवा<br>श्रेणी-३ | लिडींग फायरमन<br>(Fire Fighter Supervisor)<br>(६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.५२००-२०२००+ग्रेड पे २४००/-) | पदोन्नती<br>१००% | अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील फायरमन किंवा ड्रायव्हर ऑपरेटर<br>या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे ५०:५० या प्रमाणात पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.. |

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|---|
| | | | **१. नामनिर्देशन** | |
| | | | **२. पदोन्नती** | |
| | | | **३. प्रतिनियुक्ती** | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १२१ | अग्निशमन सेवा<br>श्रेणी-३ | ड्रायव्हर ऑपरेटर<br>(Fire Fighter Driver)<br>(६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.५२००-२०२००+ग्रेड पे १९००/-) | नामनिर्देशन<br>१००% | 1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पुर्ण.<br>क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>ड) जड वाहन चालक म्हणून किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>फ) **शारीरिक पात्रता :-**<br>१) उंची - किमान १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२) छाती - साधारण ८१ सें.मी., फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>३) वजन - किमान ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी - चांगली.<br>ग) **वयोमर्यादा –** उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|---|
| | | | १. नामनिर्देशन | |
| | | | २. पदोन्नती | |
| | | | ३. प्रतिनियुक्ती | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १२२ | अग्निशमन सेवा<br>श्रेणी-३ | फायरमन<br>(Fireman)<br>(६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.५२००-२०२००+ग्रेड पे २०००/-) | नामनिर्देशन<br>१००% | 1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पुर्ण.<br>क) **शारीरिक पात्रता :-**<br>१) उंची - किमान १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२) छाती - साधारण ८१ सें.मी., फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>३) वजन - किमान ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी - चांगली.<br>ड) **वयोमर्यादा** — उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |
| १२३ | अग्निशमन सेवा<br>श्रेणी-४ | फायरमन मदतनीस<br>(Fire Fighter Bigari) | नामनिर्देशन<br>१००% | 1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.<br>ब) **शारीरिक पात्रता :-**<br>१) उंची - किमान १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२) छाती - साधारण ८१ सें.मी., फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>३) वजन - किमान ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी - चांगली.<br>क) **वयोमर्यादा** — उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शं. त्र्यं. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.